# मानवी हक्क आणि शिक्षण व्यवस्था

- *प्रा. डोंगरे एल.बी.

जागतिकीकरण, दहशतवाद, पर्यावरणवाद याबरोबरच मानवी हक्कही आंतरराष्ट्रीय राजकारण, आंतरराष्ट्रीय संस्था संघटनांच्या अध्ययनाचा व संशोधनाचा चिंतनाचा विषय बनला आहे. मानवी हक्क ही संकल्पना विकसनशील राष्ट्रांशीच मर्यादित नसून, ती विकसीत राष्ट्रांशीही निगडीत आहे. महासत्तावान अमेरिकेसारख्या राष्ट्रांनी सर्वाधिक मानवी हक्कांचे उल्लघंन केले आहे. मानवी अस्तित्वाबरोबरच मानवी हक्क एक जागतिक समस्या म्हणून पुढे आली आहे. मानव समाजामध्ये सामुदायिकपणे जीवन जगत असताना सर्वांना समान हक्क असावेत, अशी रास्त भूमिका असते, परंतु यांचे वास्तव वेगळे आहे. मानवानेच मानवा-मानवात रंगभेद, वर्णभेद, जातिभेद, धर्मभेद, लिंगभेद, पंथभेद निर्माण करून त्या वर्गाचे, वर्णाचे, जातीचे, धर्माचे, पंथाचे मानवी हक्क हिरावून घेऊन त्यांना गुलाम/दास बनवण्यात आले. भारतामध्ये जन्माच्या आधारे जाती व्यवस्था निर्माण करून स्पृश्य- अस्पृश्य जाती निश्चित करण्यात आल्या आणि मानवी हक्क नाकारून त्यांना गुलाम बनवण्यात आले.

जगातील सर्व राष्ट्रांना समान मानवी हक्क प्रदान करून ते सुरक्षित ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने १० डिसेंबर १९४८ ला मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्याचा आरंभच या महत्त्वाच्या विधानाने होतो, ''सर्व माणसे जन्मतःच समान आहेत आणि त्यांना जन्मतःच अविच्छिन अधिकार व मूलभूत स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे, परंतु जगातील वास्तव विसंगत दिसून येते. आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या १९७८ च्या धोरणात्मक परिपत्रकानुसार वरील सर्व हक्क व्यक्तीला मिळाले पाहिजे अशी भूमिका आंतराष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची व त्या-त्या राष्ट्रांची आहे, परंतु त्याचे वास्तव वेगळे आहे. जगातील प्रत्येक राष्ट्रात वेगवेगळ्या आधारांवर मानवी हक्क हिरावून घेतले जातात, हे वास्तव नाकारता येत नाही.

---

* राज्यशास्त्र विभाग प्रमुख, हु. ज.पा. महाविद्यालय, हिमायतनगर, ता. जि. नांदेड.

## मानवी हक्क आणि शिक्षण व्यवस्था

मानवी हक्क आणि शिक्षण व्यवस्था यांचे अतूट नाते आहे. संयुक्त राष्ट्र संघाने शिक्षण व त्यास पूरक कृतिकार्यक्रमांवर जोर दिला आहे. तसाच भारतीय राज्यघटनेनेही शिक्षणाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी घटनेच्या कलम ४५ मध्ये ६ ते १४ वर्षांखालील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे, मोफत राज्यनियंत्रित शिक्षण दिले जाईल. तसेच कलम २९ व ३० मध्ये शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क प्रदान केले आहे. घटना अंमलात आल्यानंतर शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांची निर्मिती शासनाने केली आहे. याशिवाय शिक्षण हा मूलभूत हक्क बनविण्यासाठी केंद्र सरकारने जुलै २००९ मध्ये तसा कायदाही केला.

अशी घटनात्मक तरतूद असताना शिक्षण व्यवस्थेचे वास्तव वेगळे आहे. आपल्या देशात ६ ते १४ वयोगटातील जवळपास ६३ दशलक्ष मुले शाळेपासून वंचित आहेत. शिक्षण घेण्याचा त्यांचा हक्क अनेक कारणांनी हिसकावून घेण्यातच जमा आहे. काश्मिरपासून ते कन्याकुमारीपर्यंत व कच्छपासून गुवाहटीपर्यंत शिक्षणाविषयी एकसंधता नाही. केरळमध्ये ९० टक्के शिक्षित आहेत तर बिहार, राजस्थान, उत्तरप्रदेश आदींसह इतर राज्यांत ४१ टक्के ते ४७ टक्के दरम्यान शिक्षणाचे प्रमाण आहे. जगात इतर राष्ट्रांत शिक्षणासाठी अर्थसंकल्पीय गुंतवणुकीची पाहणी करता असे निदर्शनास येते की, आपल्या देशाची शिक्षणासाठीची आर्थिक गुंतवणूक ही अत्यल्प स्वरूपाची आहे. अर्थात शासनाची उदासीनता, शैक्षणिक सुविधांचा अभाव, शिक्षणाचे बाजारीकरण इत्यादी अनेक कारणांमुळे भारतीय शिक्षण व्यवस्था समस्यांच्या विळख्यात सापडली आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून संवेदनशील नागरिक तयार होतात. ज्या समाजात संवेदनशील नागरिक वास करतात, त्या समाजात मानवी हक्क चांगल्याप्रकारे उपभोगता येतात. शिक्षणाच्या माध्यमातून मानवी हक्काचे संरक्षण व संवर्धन होते असे म्हणणे चुकीचे ठरेल, परंतु ते उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर शिक्षणप्रणाली मूल्याधिष्ठित असावी लागते. शिक्षण हे संक्रमणाचे माध्यम आहे. तसेच ते मूल्य रुजविण्याचे साधनही बनवावे लागेल. सध्या समाजातून मानवी मूल्ये हद्दपार झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे. सध्याची शिक्षणपद्धती मूल्यांऐवजी ज्ञानप्राप्तीवर अधिक भर देते. शिक्षणाच्या माध्यमातून मानवी मूल्ये, घटनेने प्रदान केलेले मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये यांचा प्रचार-प्रसार झाला पाहिजे. हक्कांबरोबर कर्तव्यांवर भर

दिला तर आपल्याप्रमाणेच इतरांनाही अधिकार असावेत, अशी मानसिकता तयार होते. हक्कांबरोबर कर्तव्याची जाणीव करून दिल्यास संतुलित व्यक्तिमत्त्वाचा विकास साधता येतो. व्यक्तीला हक्कांबरोबरच कर्तव्याप्रती जागरूक, कर्तव्यनिष्ठ, नैतिक बनवण्याचे प्रभावी माध्यम शिक्षण आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला कर्तव्याची जाणीव निर्माण होऊन माझा विकास जसा झाला तसा दुसऱ्याचाही झाला पाहिजे, ही जाणीव निर्माण होते.

महाविद्यालये, विद्यापीठे, अध्ययन केंद्रांबरोबर प्रबोधनाची केंद्रे झाली पाहिजेत. यासाठी महाविद्यालये, विद्यापीठांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोग, मानवी हक्कांचा जाहीरनामा, मानवी हक्कांसंबंधित संघटना, चळवळी, भारतीय राज्यघटना यांचा अभ्यासक्रमात समावेश करावा. महाविद्यालये विद्यापीठांमध्ये मानवी हक्कांचे अध्ययन करणारे अध्ययन/संशोधन केंद्र स्थापन करून नागरिकांना मानवी हक्कांप्रती जागरूक बनविता येते. जोपर्यंत शिक्षण व्यवस्था ही मूल्याधिष्ठित होऊन संवेदनशील, कर्तव्यदक्ष नीतिमान नागरिक तयार होत नाहीत, तोपर्यंत मानवी हक्कांचे उल्लंघन होत राहील. म्हणून संवेदनशील व कर्तव्यदक्ष नागरिक निर्माण करण्याची बांधीलकी शिक्षण व्यवस्थेने प्रभावीपणे पार पाडल्यास मानवी हक्क सुरक्षित राहतील. म्हणून मानवी हक्कांचे व शिक्षण व्यवस्थेचे अतूट असे नाते आहे.

### संदर्भ


१. मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३, ॲड. अभया शेलकर.
२. मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३, ॲड. अभया शेलकर.
३. मानवी हक्क, डॉ. नागोराव कुंभार/सुधाकर कुलकर्णी.
४. आंतरराष्ट्रीय संबंध, डॉ. वसंत रायपूरकर.


❖ ❖ ❖